मराठी राष्ट्रीय दैनिक

लोकमत

मुंबई | बुधवार, दि. ३ डिसेंबर २००८ | पृष्ठे : १२+४=१६ किंमत – रु. २.००

www.lokmat.com www.epaper.lokmat.com



# स्पर्म निवडीसाठी आयएमएसआय

## आयव्हीएफसाठी देशातील पहिले मायक्रोस्कोप तंत्र

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)** – देशात आयव्हीएफ (इन विर्टो फर्टिलिटी) उपचार पद्धतीचा अवलंब करणाऱ्यांचे प्रमाण वाढत असून अचूक स्पर्मची निवड करण्यासाठी भारतात प्रथमच आयएमएसआय (इन मायक्रोस्कोप स्पर्म इंजेक्शन) हे आधुनिक तंत्र विकसित करण्यात आले आहे.

मुंबईतील लीलावती रुग्णालयात डॉ. हृषीकेश पै आणि डॉ. नंदिता पालशेतकर यांनी आयव्हीएफ उपचारपद्धतीतील इन्ट्रा सायटोप्लस्मिक स्पर्म इंजेक्शनसाठी (आयसीएसआय) आयएमएसआय हे अद्ययावत तंत्र विकसित केले आहे. ज्या जोडप्यांना नैसर्गिक गर्भधारणा होऊ शकत नाही, अशा जोडप्यांकडून इन विट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) उपचाराचा अवलंब केला जातो.

भारतात १९७८मध्ये पहिली टेस्ट ट्यूब बेबी जन्माला आले. त्यानंतर १९९२मध्ये अंड बाहेरून न घेता, आयव्हीएफच्या उपचारपद्धतीने पतीमधील स्पर्म पत्नीच्या स्त्रीबीजात घेऊन गर्भधारणा करण्यात डॉक्टरांना यश आले. नैसर्गिक गर्भधारणा न होण्यामागे बहुतांश वेळा पुरुषांमध्ये दोष आढळतो. पुरुषांमधील शुक्राणुंची संख्या कमी असते अथवा वयोमानानुसार ती कमी होत जाते. तर काही वेळा स्पर्म अॅबनॉर्मल असतात. अशा वेळी योग्य स्पर्मची निवड करण्यासाठी डॉ. पै आणि डॉ. पालशेतकर यांनी आयएमएसआय हे तंत्र विकसित केले आहे. एका वेळी ७,००० स्पर्ममधून अचूक स्पर्म निवडून स्त्रीबीजात रोवण्यासाठी हे तंत्र विकसित करण्यात आले आहे. देशातील हे पहिलेच तंत्र असून त्यामुळे सुदृढ व निरोगी बाळ जन्माला येईल, असा विश्वास डॉ. पालशेतकर यांनी व्यक्त केला.

> “एकाच वेळी ७,००० स्पर्ममधून अचूक स्पर्म निवडून स्त्रीबीजात रोवण्यासाठी आधुनिक मायक्रोस्कोप तंत्र विकसित करण्यात आले आहे. देशातील हे पहिलेच तंत्र असून त्यामुळे सुदृढ व निरोगी बाळ जन्माला येईल.
>
> – डॉ. नंदिता पालशेतकर, लीलावती रुग्णालय”

